फौ.कि.अर्ज क्र. ३१०/२०२५
तुकाराम वि. वैशाली

## निशाणी क्र. १ खाली आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा तुकाराम महादेव पटेकर यांनी मानसिक आरोग्य कायदा, २०१७ चे कलम १०२ अन्वये गैरअर्जदार तथा कथित मनोरूग्ण वैशाली तुकाराम पटेकर, वय ३७ वर्षे, हिस शासकीय मनोरूग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जामध्ये गैरअर्जदार तथा कथित मनोरूग्णाची प्राथमिक चौकशी करण्याकामी या न्यायालयाकडून विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांची न्यायालयीन मित्र *(Amicus Curiae)* म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या तोंडी म्हणण्यानुसार तसेच मनोरूग्णास विचारलेल्या प्रश्नाला तिने विसंगतपणे दिलेली उत्तरे पाहता तिला उपचाराकामी पाठविण्यात आलेले होते.

३. कथित मनोरूग्णाची यांची तपासणी केली असता ससून जनरल हॉस्पीटल पुणे यांनी तिला वैद्यकिय उपचाराची गरज असल्याचे कथन केलेले आहे. त्यांच्या उपचाराप्रमाणे तिला स्किझोफ्रेनिया आहे आणि तिला वैद्यकिय तपासणी आणि नियमीत सल्लामसलत आवश्यक आहे. तसेच तिला बंद मनोरुग्णालयात इनडोअर व्यवस्थापन आणि पुनर्वसन आवश्यक आहे. त्यामुळे तिला रिजनल मेंटल हॉस्पीटल येरवडा, पुणे येथे पुढील उपचाराकरीता पाठविणे उचित वाटते.

४. करिता, अर्जदाराचे कथन, अर्जासोबत सादर केलेले दस्त आणि गैरअर्जदाराची सकृतदर्शनी वागणूक या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आदेश

१. रुग्णास रिजनल मेंटल हॉस्पीटल येरवडा, पुणे येथे दाखल करुन वैद्यकिय उपचार करुन घेणे.

२. मा. अधिक्षक, रिजनल मेंटल हॉस्पीटल येरवडा, जि.पुणे यांना कळविण्यात येते की, त्यांनी गैरअर्जदार तथा कथित मनोरूग्ण

वैशाली तुकाराम पटेकर हिस स्वत:च देखरेखीखाली ठेवून तिचे मानसिक आरोग्याबाबत तपासणी करून तिस योग्य तो उपचार करुन प्रस्तुत आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत कथीत मनोरुग्ण वैशाली तुकाराम पटेकर यांना देखभालीची गरज आहे किंवा कसे याचा लेखी अहवाल या न्यायालयात न चुकता सादर करावा.

३. अर्जदाराकडून सदर मनोरूग्णाचा वैद्यकीय उपचाराचा खर्च घेण्यात येवू नये.

४. अर्जदाराने सदर मनोरूग्णास संबंधित मनोरूग्णालयात दाखल केले किंवा नाही याचा अहवाल या न्यायालयात त्वरीत सादर करावा.

५. अर्जदार यांनी त्यांचा पत्ता बदलल्यानंतर या न्यायालयास व संबंधित मनोरूग्णालयास त्वरित कळवावे.

SAVITA APPASO MALI
Digitally signed by SAVITA APPASO MALI
Date: 2025.08.11 17:30:28 +0530

पुणे
दिनांक: ११.०८.२०२५

(एस. ए. माळी)
५वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे.
(वडगाव मावळ, पुणे)